# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नवी मुंबई पोलिसांच्या सागरी गस्तीसाठी असलेल्या "शक्ती" या नौकेत स्फोट झाल्याबाबत,**

**(१) ७२२ (१५-०१-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलिसांच्या सागरी गस्तीसाठी असलेल्या "शक्ती" या नौकेत दुरुस्तीचे काम सुरु असताना दिनांक ७ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्फोटाची कारणे काय आहेत, व स्फोटात कोणती हानी झाली आहे,

(3) असल्यास, याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) सदर नौकेवर मे.गोवा शिपयार्ड लि. यांचेकडून नियतकालीक देखभालीचे / नौकेच्या इंधन टाकीच्या साफसफाईचे कामकाज सुरु असतांना, अचानकपणे आग लागली ही घटना अपघाती स्वरुपाची असून यामध्ये कोणताही स्फोट झालेला नाही.

(२) अ.क्र. १ च स्पष्टीकरणामध्ये आग लागल्याचे कारण नमूद केले आहे. सदर आगीमुळे नौकेचे काही प्रमाणात नुकसान झाले तसेच, मे.गोवा शिपयार्ड लि. यांच्या २ टेक्निशियन यांना भाजल्याच्या जखमा झाल्या.

(३) जखमी झालेले २ टेक्निशियन यांचे सर्व औषधोपचार मे.गोवा शिपयार्ड लि. यांच्याकडून करण्यात आले व ते दोन्ही टेक्निशियन तंदुरुस्त आहेत. आगीमुळे नौकेचे नुकसान/दुरुस्ती व त्यावरील खर्च संपुर्णपणे मे.गोवा शिपयार्ड लि. यांचेकडून करण्यात आलेली आहे व सदर नौका सुस्थितीत होऊन सद्य:स्थितीत सागरी गस्तीत कार्यरत आहेत.

---

**अहमदनगर महानगरपालिकेने केंद्र शासित JNNURN योजनेअंतर्गत बसेस खरेदी करण्याबाबत**

**(२) २४९७ (२७-०१-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महापालिकेने केंद्रशासित JNNURN योजनेअंतर्गत बसेस खरेदी करण्याबाबत नोडल एजन्सी (एमएमआरडीए) यांनी काढण्यात आलेल्या त्रुटीची पुर्तता महापालिकेवरील पत्र क्रमांक ११२९ दिनांक ३ डिसेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच शासनाच्या नगरविकास विभाग अथवा एमएमआरडीए कडून सदर प्रकल्प अहवालास मान्यता न मिळाल्यास प्रकल्प अहवालास केंद्र शासनाकडून मंजूरी मिळून शकल्याने अहमदनगर पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महापालिकेचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अहमदनगर महानगरपालिकेचा बसेस खरेदी प्रस्ताव विहित कालावधीत शासनास प्राप्त न झालेने व दरम्यान जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान संपुष्टात आल्याने सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेली नाही. केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अहमदनगर शहराचा समावेश असून सदर अभियानांतर्गत नागरी परिवहन प्रकल्पासाठी अनुदान उपलब्ध होऊ शकणार नाही.

---

**सोलापूर महापालिकेची स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसुली मोहिम सुरु करण्याबाबत.**

**(३) १०९५९ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक असून मागील वर्षाच्या तुलनेने स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसुली कमी असल्याने महापालिका आयुक्त यांनी एलबीटी वसुली मोहिम सुरु केली आहे हे खरे आहे काय,

(२) महापालिकेच्या आर्थिक स्थितीचा अहवाल मुख्य लेखापाल कार्यालयाकडून आल्यावर मनपाची वसुली मोहिम सुरु करण्यात आली त्यामुळे वसुलीचे प्रमाण वाढले व करापोटी ७० लाख तर एलबीटीचे ८० लाख अशी दिड कोटी वसुली आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सर्वच जिल्ह्यात एलबीटी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना स्थानिक संस्था कर भरण्यासाठी सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स व इतर व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची वेळोवेळी बैठक घेऊन एल.बी.टी. ची रक्कम भरणेबाबत आवाहन केले होते.

आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांची ही कार्यवाही दि.०१ ऑगस्ट, २०१५ पूर्वीची आहे, कारण शासनाने दिनांक ०१ ऑगस्ट, २०१५ पासून रु.५०.०० कोटीपेक्षा कमी वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट दिली आहे.

(२) सोलापूर महानगरपालिकेस स्थानिक संस्था करापासून सन २०१३-१४ या कालावधीत रु.१२१५.०३ कोटी व सन २०१४-१५ मध्ये रु.१०८.७१ कोटी रक्कम प्राप्त झाली आहे.

(३) शासनाने दिनांक ०१ ऑगस्ट, २०१५ पासून रु.५०.०० कोटीपेक्षा कमी वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली शहरात अतिशय जुन्या झालेल्या इमारती

**(४) १२४६२ (०७-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) शहरात अतिशय जुन्या झालेल्या इमारती पावसाळ्याचे दिवसात कोसळल्यामुळे अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या धोकादायक इमारतीचे सर्व्हेक्षण नगरपरिषदेकडून करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, शहरातील एकूण किती इमारती धोकादायक असल्याचे आढळून आले आहे,

(४) असल्यास, सदर इमारती कोसळून अपघात होवू नये याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) नाही. तथपि, नगर परिषदेच्या क्षेत्रिय अधिकारी यांच्या मार्फत सर्वेक्षण करण्यात आले असता हिंगोली शहरामध्ये एकूण १४ इमारती धोकादायक असल्याचे आढळून झाले आहे.

(४) सदरहू धोकादायक इमारती रिकाम्या करुन घेण्याकरिता संबंधितांना नगर परिषदेमार्फत नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

---

### कोल्हापूर शहरातील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सोईसुविधा देण्याबाबत

**(५) १९६८२ (३१-०७-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात शिवाजी उद्योग नगर, वाय.सी. पवार नगर व पांजरपोळ या ठिकाणी असलेल्या औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी कोणताही विकास आराखडा शासनाने तयार केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीमध्ये कोणत्याही मुलभूत सोईसुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या आराखडा अद्यापपर्यंत तयार न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६)** :(१) व (२) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते, पार्क यासारख्या सोयी सुविधा पुविण्यात येत आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दादर (प) मुंबई येथील काकासाहेब गाडगीळ मार्गावरील लोकमान्य नगर प्रियदर्शनी सहकार पुर्नविकास प्रकल्पातील गैरप्रकाराची चालू असलेली चौकशी**

**(६) १९७०१ (११-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (प) मुंबई येथील काकासाहेब गाडगीळ मार्गावरील लोकमान्य नगर प्रियदर्शनी सहकार पुर्नविकास प्रकल्पातील फसवणूक, गैरप्रकार व अनियमिततेची मुंबई इमारत पुर्नरचना मंडळातर्फे चालू असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आलेली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर चौकशी किती कालावधीत पूर्ण होणार आहे ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०७-२०१६)** :(१), (२) व (३) दादर (प) मुंबई येथील काकासाहेब गाडगीळ मार्गावरील लोकमान्य नगर प्रियदर्शनी सहकार पुर्नविकास प्रकल्पातील रहिवाश्यांची फसवणू,क गैरप्रकार व अनियमिततेच्या अनुषंगाने विकासकाचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी तक्रारकर्त्यांमार्फत करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाविरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.1522/2011 मध्ये मा.उच्च न्यायालयाद्वारे दि.19.1.2011 रोजी दिलेल्या आदेशामध्ये सदर प्रकल्पाविरोधात विविध न्यायालयांमध्ये वेळोवेळी दाखल दाव्यांमुळे प्रकल्पास विलंब झाल्याची बाब नमूद करुन व व्यक्त करुन याचिका फेटाळली आहे. मा.उच्च न्यायालयाची सदर भुमिका मा.सर्वोच्च न्यायालयाने देखिल कायम केलेली आहे. विकासकास देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची तक्रारकर्त्याची मागणी मान्य केल्यास प्रकल्पास विलंब होऊन, मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायलायाच्या आदेशांचा अवमान होण्याची शक्यता पाहता तक्रारदाराची मागणी मान्य करणे शक्य नसल्याचा निर्णय उपाध्यक्ष तथा कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे स्तरावर घेण्यात आलेला आहे.

---

## चिखलदरा (जि.अमरावती) येथे दूषित पाण्याचा होत असलेला पाणीपुरवठा

**(७) २७०७४ (२९-०७-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) येथील सुमारे ५ हजार नागरीकांना लाल रंगाच्या दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी काही वर्षापूर्वी दोन कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला असून सुध्दा शुध्द पाणी पुरवठा झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत चिखलदरा पाणीपुरवठा प्रस्तावास वितरण व्यवस्थेत सी.आय./डी.आय. पाईप ऐवजी एचडीपीई पाईपचा वापर करणेबाबत सुधारणा करण्याच्या अटीच्या अधीन राहून तत्वत: मान्यता दिली आहे. तथापि चिखलदरा नगरपारिषदेकडून सुधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येवला शहरातील विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(८) २८४४९ (२१-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला शहरातील सि.स.नं.३८०७/३८०८ आणि ३९०७/३९०८ मधील १६६ विस्थापित व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विस्थापित व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी येवले नगरपरिषदेने पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध झालेल्या एकूण १६६ गाळयांचे प्रचलीत पध्दतीनुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत लिलावाने वितरण करणे बाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना शासनपत्र क्र.एमयुएम-२०१४/प्र.क्र.७८/नवि-१७, दिनांक १३ मे, २०१५ कळविण्यात आलेले आहे.

---

**पनवेलमधील खांदा वसाहतीतील इमारतींची व रस्त्यांची दुरावस्था व पार्किंगच्या समस्याबाबत**

**(९) २८७२४ (२१-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने बांधलेल्या ५० हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या पनवेलमधील खांदा वसाहतीतील इमारतींची व रस्त्यांची दुरावस्था व वाहतूक पार्किंगची समस्या तात्काळ दुर करावी यासाठी वसाहतीमधील नागरिकांनी सिडको प्रशासनाचे अधिक्षक अभियंता यांना अनेकवेळा पत्रे पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) सिडकोने खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.) येथील रस्त्यांच्या नुतनीकरण करण्याचा कार्यादेश मे.स्वस्तीक ईन्फ्रा लॉ.प्रा.लि. यांना दिनांक ३१.०५.२०१६ रोजी देण्यात आलेला आहे. सदर कामाची सुरुवात सेक्टर-५ मधून करण्यात आलेली आहे व कामाचा कालावधी १५ महिने असून हे काम ३१.०८.२०१७ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे.

---

**धुळे शहराला पाणी पुरवठा करणा-या तापी पाणी पुरवठा योजनेमुळे महापालिकेवर कर्ज झाल्याबाबत**

**(१०) २९३०२ (२१-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहराला पाणी पुरवठा करणा-या तापी पाणी पुरवठा योजनेमुळे महापालिकेवर १६६ कोटी ६८ लाख ९६ हजार ३५१ रुपये कर्ज झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराच्या विकासासाठी सदर कर्ज माफ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत या कर्जापोटी अनुदान निधीच्या माध्यमातून किती रक्कम वसुल करण्यात आली आहे,
(४) असल्यास, कधीपर्यंत हे कर्ज माफ करण्यात येईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) तत्कालिन धुळे नगर पालिकेने पाणी पुरवठा योजनेसाठी आयुर्विमा महामंडळ व खुल्या बाजारातून रु.३९.४४ कोटी कर्ज घेतले होते. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून थकीत रु.१६६.६८ कोटी रकमेची मागणी करण्यात आली आहे.
(२) सदर कर्जाची एकरकमी परतफेड करण्यासंदर्भात अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीने निर्णय घ्यावा असे दि. २४.२.२०१६ च्या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे.
(३) या कर्जापोटी धुळे महानगरपालिकेने रु.३२.७९ कोटी रक्कम अदा केली आहे.
(४) सदर कर्जाची एकरकमी परतफेड करण्यासंदर्भात निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये वगळल्यानंतर परत सदर 27 गांवे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय**

**(११) ३२७६५ (२१-०१-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावांना महापालिकेने वगळल्यानंतर परत सदर २७ गांवे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवडणुकीच्या तोडांवर सदर २७ गांवे परत महापालिकेमध्ये समाविष्ट करण्याबद्दल निवडणूक आयोगाकडे पाठविलेला प्रस्ताव आयोगाने फेटाळला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१), (२) व (३) राज्य शासनाने शासन अधिसूचना, दिनांक १४ मे, २०१५ अन्वये उक्त २७ गांवे दिनांक ०१ जून, २०१५ पासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात समाविष्ट केली. तद् नंतर या २७ गावांसहित ऑक्टोबर, 2015 मध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणूका पार पाडल्या आहेत.

---

**जालना नगरपालिकेत फावडे-टोपल्याची खरेदीत भ्रष्टाचार झाल्याबाबत**

**(१२) ३३५८६ (२१-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना नगरपालिकेत फावडे-टोपल्याची खरेदीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याने याप्रकरणी तातडीने चौकशी करण्याची मागणी माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास सदस्यांनी नगराध्यक्षांकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) जालना नगरपरिषदेच्या माहे ऑक्टोबर, 2015 च्या सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेव्यतिरिक्त नगरपालिका सदस्यांनी फावडे - टोपल्या खरेदीत तफावत असल्याबाबत विषय उपस्थित केला होता. परंतु या बाबात कोणतेही लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही आणि या विषयावर कोणतीही चर्चा झालेली नाही.

---

**मुंबईतील बॉम्बे डाईंग आणि श्रीनिवास कापड गिरणींच्या**
**जमीनींवर कामगारांसाठी घरे बांधण्याबाबत**

**(१३) ३४३९७ (२१-०१-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिका हद्दीतील बॉम्बे डाईंग आणि श्रीनिवास कापड गिरणींच्या जमीनींवर कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी म्हाडाने नविन विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर कामगारांसाठी सुमारे साडेपाच हजार घरे बांधण्याचे नियोजन केले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीवर कामगारांसाठी घरे किती काळात बांधली जाणार आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) बॉम्बे डाईंग येथील जमिनीचा ताबा म्हाडाकडे दि.०९.१२.२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार गृहनिर्माण प्रकल्पाच्या योजनांचे नकाशे म्हाडामार्फत मुंबई महानगरपालिकेकडे दि.०७.०१.२०१५ व दि.०९.०२.२०१५ रोजी सादर करण्यात आले होते. यामध्ये गिरणी कामगारांसाठी ३६९६ सदनिका व संक्रमण शिबिरासाठी १४४० सदनिका अशा एकूण ५१३६ सदनिकाचा समावेश आहे.

मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबई शहराचा विकास आराखडा २०१४-२०३४ सादर करण्यात आला होता. सदरहू आराखड्यात बॉम्बे डाईंग मिलच्या ७० टक्के जमिनीवर पुनर्वसनासाठी, रस्त्यांसाठी आरक्षण दर्शविण्यात आले होते. या बाबीस म्हाडामार्फत आक्षेप नोंदविण्यात आला. तद् नंतर बॉम्बे डाईंग, वडाळा येथील विनाआरक्षित क्षेत्रावर २८८ + २७८ = ५६६ सदनिकांच्या नकाशांना महानगरपालिकेमार्फत मंजूरी प्रदान करण्यात आली असून काम प्रगतीपथावर आहे. आरक्षण असलेल्या उर्वरित क्षेत्राच्या नकाशांच्या मंजुरीकरीता महानगरपालिकेकडे पाठपुरावा चालू आहे.

श्रीनिवास मिलच्या जमिनीचा ताबा दि.१८.०९.२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदरहू योजनेत ४७२ + २३६ = ७०८ इतक्या सदनिका प्रस्तावित असून महानगरपालिकेकडून नकाशांना मंजुरी प्राप्त झालेली आहे. दि.१०.११.२०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून काम प्रगतीपथावर आहे.

उपरोक्त दोन्ही मिलच्या सदनिकांचे बांधकाम सुमारे दोन वर्षाच्या कालावधीत पुर्ण होईल असे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद नगरपालिकेत दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(१४) ३४९५१ (२१-०१-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद नगरपालिका अंतर्गत जलशुध्दीकरण योजना दीड कोटी रुपये खर्च करुन बांधलेली इमारत असतानाही येथील नागरिकांना दूषीत पाणी प्यावे लागत आहे त्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलशुध्दीकरण केंद्राची आवश्यक त्या सुधारणा करुन सदर केंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) व (२) धर्माबाद नगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या स्त्रोतास कमी पर्जन्यमानामुळे पाणी नसल्याने जलशुध्दीकरण यंत्रणा बंद आहे. जुन्या पाणी स्त्रोता नजीक विधंनविहिरी घेवून व नजीकच्या साठ्यातील पाणी एकत्रित करुन शहरास ठराविक कालावधीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

शहरवासीयांना पाणीपुरवठा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार ब्लिचींग पावडर व तुरटीचा वापर करुन पाणी शुध्द करुन पुरवठा करण्यात येतो. तसेच वेळोवेळी पाण्याचे नमुने घेऊन शुध्दतेची खात्री करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरात सुलभ शौचालयांचे सर्वेक्षण करण्यासाठी महानगरपालिकेने खाजगी बेरोजगार संस्थेची नेमणुक केल्याबाबत**

**(१५) ३८२८७ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात नवबौध्द व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरीकांकडे सुलभ शौचालये आहेत किंवा नाहीत, याचे सर्वेक्षण करण्यासाठी महानगरपालिकेने खाजगी बेरोजगार संस्थेची नेमणुक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनातील अधिकाऱ्यांनी ५ लक्ष रुपयात होणारे काम २ कोटीपर्यंत नेले व त्यातील तब्बल ४८ लक्ष रुपये अदाही केले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन शासन संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र पुरस्कृत कमी खर्चाच्या वैयक्तीक स्वच्छता योजनेअंतर्गत औरंगाबाद शहरातील अल्प उत्पन्न धारक कुटूंबाना शौचालयाची व नळ पाणी पुरवठा योजनेचा लाभ देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १०/९/२००८ नुसार वर्तमान पत्रात जाहिरात देवून युवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था, औरंगाबाद या संस्थेची निवड करुन त्यांना रु.१.६३ कोटी रकमेस हे काम देण्यात आले होते. त्यांनी केलेल्या कामाच्या अनुषंगाने दोन टप्प्यात त्यांना आता पर्यंत रु.४८ लक्ष अदा करण्यात आले आहेत.

(३) व (४) या प्रकरणी महानगरपालिका आयुक्त, औरंगाबाद यांच्या मार्फत चौकशी करण्यात येत आहे.

---

**सेलू नगरपरिषदेमध्ये (जि.परभणी) करापोटी वसुल केलेल्या रक्कमेचा अपहार झाल्याबाबत**

**(१६) ३८३९२ (२१-०१-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू नगरपरिषदेमध्ये (जि.परभणी) नागरीकांकडून करापोटी वसुल केलेल्या रक्कमेचा अपहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपहार झालेली एकूण रक्कम किती आहे तसेच सदर प्रकरणी अपहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) नगर परिषद सेलू येथील करापोटी अपहार झालेली रक्कम रु.१७,१८,१२१/- इतकी आहे. तसेच सदर प्रकरणी नगरपरिषदेतील सहा वसुली लिपिक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच चार कर्मचारी व तत्कालिन मुख्याधिकारी, नगर परिषद सेलू यांची विभागीय चौकशी विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये बी.एस.यु.पी. प्रकल्पातंर्गत सदनीकांचे वाटप झाल्याबाबत

**(१७) ३८७७० (२३-१२-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २००८ साली बी.एस.यु.पी. प्रकल्पाकरीता ४ प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाकरिता निधीची तरतूद करुन सदनिका देखील बांधण्यात आल्या आहे,

(३) असल्यास, सदर सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

काही सदनिकांचे बांधकाम पुर्ण झाले असून उर्वरित सदनिकांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) डी.पी.आर. १ मधील आंबेडकरनगर पॅकेज क्र.८ अंतर्गत ३०७ व दत्तनगर पॅकेज क्र. ९ मधील १८९ सदनिकांचे बांधकाम पुर्ण झालेले असून आंबेडकरनगर येथील ३०७ पैकी ३०० व दत्तनगर येथील १८९ सदनिका पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आल्या आहेत. आंबेडकरनगर मधील उर्वरित ७ लाभार्थ्यांच्या पात्रतेबाबतचा निर्णय कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा महासभेने स्थगित ठेवला आहे. कचोरे पॅकज क्र.१ व २ उंबर्डे पॅकेज क्र.५ व ७ तसेच इंदिरानगर कल्याण पश्चिम पॅकेज क्र.१२ चे काम अंतिम टप्प्यात आहे.

डी.पी.आर. ३ खडेगोळवलीचे काम कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रद्द केले असून डी.पी.आर.2 व डी.पी.आर. ४ चे काम प्रगतीपथावर आहे.

(४) बी.एस.यु.पी. प्रकल्प पुर्ण करण्यास झालेल्या विलंबाची कारणे पुढीलप्रमाणे आहेतः-

(i) मंजूर प्रकल्पांपैकी डी.पी.आर. १ व २ अंतर्गत असलेल्या दत्तनगर, इंदिरानगर डोंबिवली येथील चाळ/इमारतधारक तसेच मौजे उंबर्डे येथील स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर विरोध करणे.

(ii) इंदिरानगर कल्याण येथील प्रकल्पाच्या भूखंडापैकी काही भाग म्हाडाच्या मालकीचा तर काही भाग यु.एल.सी. अंतर्गत शासनाचे नावे झालेल्या जमिनीचा असणे, यु.एल.सी. कायदा रद्द

झाल्यामुळे शासनाच्या ताब्यात असलेला भूखंड संबंधित जमिन मालकाने रितसर संबंधित प्राधिकरणामार्फत पुन्हा स्वत:च्या नावे वर्ग करुन घेतल्यामुळे त्या जागेवर बांधकाम करता न येणे.

(iii) आंबेडकरनगर, इंदिरानगर डोंबिवली, इंदिरानगर कल्याण येथील रहिवाशांनी मोठ्या बी.एस.यु.पी. प्रकल्पाच्या जागेलगतचे कब्जेदार तसेच इनसिटू प्रकल्पातील झोपडीधारकांनी विविध दावे दाखल करणे.

(iv) प्रत्यक्षात जी कामे सुरु करण्यात आली त्या कामांना ठेकेदारांनी योग्य ती गती न देणे, त्यातच रेती उपशावर वारंवार आलेल्या बंदीमुळे रेतीचा तुटवडा निर्माण होणे, त्यामुळे कालानुरुप दरवाढ होणे, ठेकेदारांनी वेळोवेळी दरवाढीची मागणी करणे, तथापि निविदेमध्ये फक्त स्टील व सिमेंटचीच दरवाढ देय असल्यामुळे उर्वरित बाबींची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दरवाढ नाकारल्याने कामांना गती न येणे.

(v) ज्या सदनिकांची कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण आहेत अशा ठिकाणी अद्याप पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला मिळालेला नसणे.

---

**राज्यात कृषी विभागाकडे कृषी अभियांत्रिकी सेवेची स्वतंत्र श्रेणी नसलेबाबत**

**(१८) ४१३८० (२८-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विभागामार्फत अनेक योजनाद्वारे बंधारे बांधणे, साठवण तलाव यासारखी कामे होत असतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे राज्यात कृषी विभागाकडे कृषी अभियांत्रिकी सेवेची स्वतंत्र श्रेणी नसल्याने अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याचे निदर्शनास आले हे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चालू वर्षी दुष्काळ निवारण करणेसाठी तसेच कामांचा दर्जा सुधारण्यासाठी राज्यात कृषी विभागाकडे कृषी अभियांत्रिकी सेवेची स्वतंत्र श्रेणी निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कृषि विभागाकडे अस्तित्वात असलेल्या प्रादेशिक कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थामार्फत (रामेती) क्षेत्रिय अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते व अशा प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी यांचे मार्फत मृद व जनसंधारणाची कामे करण्यात येतात. सद्य:स्थितीत कृषि विभागातील महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, गट-ब व गट-क संवर्गात कृषि अभियांत्रिकी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना सरळसेवेने स्पर्धा परीक्षद्वारे नियुक्तीच्या संधी उपलबध असल्याने कृषि अभियांत्रिकी सेवेची स्वतंत्र श्रेणी निर्माण करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्हातील कामगार आयुक्त कार्यालयात पदे रिक्त असल्याबाबत

**(१९) ४१५८५ (०५-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील कामगार आयुक्त कार्यालयामध्ये अनेक पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात पदे रिक्त असतानाही इतर पाच स्वतंत्र मंडळाचा अतिरिक्त कार्यभारही याच कार्यालयावर टाकण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली जिल्हातील कामगार आयुक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सहायक कामगार आयुक्त, सांगली कार्यालयामार्फत माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळ घरेलू कामगार मंडळ, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे इ. काम हाताळण्यात येते.

(३) व (४) गट अ चे पद सद्य:स्थितीत रिक्त असून त्याच्या अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे व गट ब चे पद भरलेले आहे. अपर कामगार आयुक्त, पुणे यांच्याअंतर्गत कार्यालयातील गट क व गट ड ची पदे भरण्याच्या सूचना कामगार आयुक्त यांना देण्यात आल्या असून त्या अनुषंगाने त्यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

### कंधार (जि.नांदेड) शहरातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(२०) ४१६०० (१३-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) शहरातील नागरिकांची तहान भागविण्यासाठीचे ११ लाख ९० हजार लिटरचे जलकुंभ पाण्याअभावी असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात पाणी स्त्रोत नसतांनाही नागरिकांकडून पाणीपट्टी वसुल केली जात आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील तीव्र पाणी टंचाई दुर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) कंधार शहरातील मन्याड नदीपात्रातील पाणीसाठा संपल्यानंतर दिनांक 4.1.2016 पासून उपलब्ध विंधनविहरी व नवीन 3 विंधनविहरी द्वारे शहरात पाणी पुरवठा केला जात होता. महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान योजनेंअंतर्गत लिंबोटी धरण ते कंधार शहरा पर्यंतची पाईप लाईन कार्यान्वीत करुन शहरास ठराविक कालावधीत पाणीपुरवठा केला जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील तसेच मुंबई व नवी मुंबईतील नागरीकांची फसवणूक करणाऱ्या नायजेरियन टोळीबाबत**

**(२१) ४२१२७ (०७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खांदेश्वर येथे आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली ड्रग्ज विकून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या नायजेरियन टोळीला पोलिसांनी पकडले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई व राज्यातील नागरीकांना ऑनलाईनवर विविध संकेतस्थळावर महागड्या वस्तु, गाड्या घेणे, विकणे, परदेशात नोकरीचे, लॉटरीचे अमिष दाखवून नायजेरियन टोळीने गंडा घातल्याची धक्कादायक बाब ही निर्दशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित टोळीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

खांदेश्वर येथे आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली ड्रग्स विकुन नागरिकांची फसवणुक करण्याबाबत गुन्ह्यांची नोंद नाही. परंतु नायजेरिय आरोपींनी कोमासिडस बियांच्या विक्रीमध्ये फिर्यादीची फसवणुक केली असल्यामुळे खांदेश्वर पोलीस, ठाणे येथे ०४/२०१६ भा.द.वि.सं. कलम ४२०, ४८९ ब, ३४ सह आय,टी,ॲक्ट कलम ६६ ब व ६६ क अन्वये दि.०८.०१.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत सीबीडी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. २०/२०१६ भादवि ४२०, ४६५, ४६८, ४७१ आय.टी.ॲक्ट कलम ६६ डी प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

(३) नागरिकांकडून प्राप्त तक्रारीवरुन आरोपीतांवर वरीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हाबाबत मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील जैविक कचरा जमा करण्यासाठी महानगरपालिकेने वॉटर ग्रेस कंपनीची केलेली नेमणूक**

**(२२) ४२२९४ (१७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील प्रत्येक रुग्णालय, रक्तपेढयांमधील जैविक कचरा जमा करण्यासाठी महानगरपालिकेने १२ वर्षापुर्वी नाशिक येथील वॉटर ग्रेस कंपनीची नेमणूक केली आहे मात्र या कंपनीने आतापर्यंत सर्व नियम, करार पायदळी तुडवुन कराराचा भंग केला असल्याचे, माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद शहरातील जैविक कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठीमे. वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनी बरोबर सन 2003 मध्ये बोल्ट (BOLT) तत्वावर औरंगाबाद महानगरपालिकेने करार केला होता. करारातील अटीनुसार शहरातील संबंधित वैद्यकीय आस्थापनांकडून महानगरपालिकेने सेवा शुल्क वसूल करुन, त्यातून स्वामीत्व शुल्क कपात करुन, उर्वरित रक्कम कंपनीस दरमहा द्यावयाची आहे. तथापि महानगरपालिकेने सन 2007 नंतर हे वसूलीचे काम मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनी यांच्याकडे सोपविले . स्थानिक निधी लेखा परिक्षा अहवालानुसार संबंधित वैद्यकीय आस्थापनाकडून सन 2007 नंतर सेवा शुल्काची वसूली न केल्यामुळे महानगरपालिकेचे रु. ३७.१० लक्षचे नुसार झाल्याचे दर्शविले आहे.

(२) औरंगाबाद महानगरपालिकेकडून फेब्रुवारी २०१६ पासून शहरातील वैद्यकीय आस्थापनांकडून जैविक कचरा विल्हेवाट शुल्क वसुली करण्यात येत आहे. लेखा परिक्षणातील नमूद थकीत रकमेची वसूली करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हडपसर तसेच फरासखाना (जि.पुणे) पोलिस स्टेशन परिसरात तपासातील व अपघातील वाहने अनेक महिन्यांपासून पार्किंग केल्याने वाहतूक कोंडी होत असल्याबाबत**

**(२३) ४२५१० (१७-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील पोलिस स्टेशन समोरील रस्त्यावर गुन्हयाच्या तपासातील व अपघातील वाहने अनेक महिन्यांपासून पार्किंग केल्याने वाहतूक कोंडी होत असून अपघाताचे प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच फरासखाना पुणे येथील पोलीस ठाण्याच्या आवारात गत वर्षी झालेल्या बॉम्बस्फोटानंतरही अनेक दिवसापासून वाहने धुळ खात पडली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सन २०१५, तसेच जानेवारी, २०१६ मध्ये पोलीस ठाण्यासमोरील रस्त्यावर वाहतूक कोंडीमुळे एकही अपघात झालेला नाही.
(२) हे खरे नाही.

फरासखाना पोलीस ठाणेच्या आवारातील जुनी वाहने हलविण्यात आली असून या ठिकाणी फक्त पोलीस वाहनांनांच पार्किंग करु दिले जाते.
(३) हडपसर तसेच फरासखाना पोलीस ठाण्याच्या समोरील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१) हडपसर पोलीस स्टेशन समोरील रस्त्यावर १०० मी. व बाहेरील बाजूस ५० मी. नो-पार्किंग करण्यात आले आहे.

२) हडपसर येथील गाडीतळ उड्डाणपूलाचे काम लवकर पूर्ण होण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.

३) गाडीतळ येथील पी.एम.पी.एम.एल. बस डेपोच्या इन आणि आऊट गेटमध्ये बदल केल्याने वाहतूक सुरळीत झाली आहे.

४) गाडीतळ चौकामध्ये 2 पोलीस कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

५) फरासखाना पोलीस ठाणेमध्ये खाजगी वाहनांना पार्किंग बंदी करण्यात आली आहे.

६) या परिसरामध्ये वाहतूक शाखेकडून वाहनांचे पार्किंगसाठी एक पोलीस कर्मचारी नेमण्यात आला आहे.

७) फरासखाना व विश्रामबाग पोलीस स्टेशनकडून एक-एक पोलीस कर्मचारी नेमण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगाव (जि.नाशिक) येथे नेहरु रोजगार सेंटर शेल्टर अकोमोडेशन (बल्ली पत्रा) या योजनेबाबत

**(२४) ४३२३४ (०७-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे सन १९९१ ते १९९३ दरम्यान संस्थेने नेहरु रोजगार सेंटर शेल्टर अकोमोडेशन (बल्ली पत्रा) या योजनेंतर्गत २५० लोकांना प्रति घर प्रमाणे रक्कम रुपये ४००० (चार हजार फक्त) कर्ज दिले, परंतू सदर कर्जाची रक्कम आजपर्यंत व्याजामुळे वाढली

असल्याने लाभार्थ्यांना ती रक्कम परत करणे अशक्य असल्याने सदरील योजनेवरील व्याज माफ करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे १८ डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर योजनेसाठी हुडको कडून रु. ११७ लक्ष कर्ज व रु. ३५ लक्ष अनुदान (केंद्र व राज्य शासनाकडून) तत्कालीन मालेगाव नगर परिषदेस प्राप्त झाले होते. सदर रक्कमेपैकी १२५४ लाभार्थीना रु.३००० कर्ज व रु.१०००/- अनुदान याप्रमाणे वाटप करण्यात आलेले होते. त्यापैकी २१३ लाभार्थीनी संपुर्ण कर्जाची रक्कम व्याजासह फेड केलेली आहे. उर्वरित १०४१ लाभार्थीकडे कर्ज रु.३२,०४,०००/- वच कर्जावरील व्याजाची मिळून एकुण रु.३१८,४३,८०१/- (दि.३१.३.२०१६ पर्यंत) येणे बाकी आहे.

सदर योजनेसाठी हुडको या संस्थेकडून प्राप्त संपूर्ण कर्जाची परतफेड महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. तसेच महासभा ठराव क्र. १५५, दि.४.१२.२०१३ अन्वये लाभार्थ्यांकडील मुळ कर्जाची रक्कम रु.३०००/- वसूल करुन व्याजाची रक्कम माफ करण्याबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिनीची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत

**(२५) ४३५०३ (२८-०४-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिनीची मोठया प्रमाणात गळती होऊन हजारो लिटर पाणी वाया जात असल्याने पाणी टंचाई निर्माण झाली असल्यामुळे सदर जलवाहिनीची त्वरीत दुरुस्ती करण्याची नागरिकांनी वारंवार मागणी करुनही सदर दुरुस्ती करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलवाहिनीतून होत असलेली पाण्याची गळती त्वरीत थांबविण्याबाबत तसेच जलवाहिनीच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) मालेगाव शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी गिरणा पंपिंग स्टेशन ते सायने जलशुध्दीकरण केंद्र पर्यंतच्या पाईपलाईनवर गळती होत असल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, महानगरपालिकेमार्फत तातडीने पाईप लाईन दुरुस्ती करण्यात आली आहे.

(२) महानगरपालिकेमार्फत सदर पाईपलाईनची नियमितपणे देखदेख (पेट्रोलींग) करण्यात येते. तसेच आढळून आलेली गळती तात्काळ दुरुस्ती करण्यात येते. तथापि, काही समाजकंटकांकडून पाईपलाईन लिकेज करण्याचे प्रकार आढळल्याने महानगरपालिकेकडून याबाबत पोलीस विभागास पत्रव्यवहार करण्यात आला असून, याबाबत लक्ष देण्याची विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषी विभागातील चार संचालक व दहा सहसंचालकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) ४३७७२ (२८-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विभागात चार संचालक व दहा सहसंचालकाची दहा पदे गत सहा महिन्यापासून रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच कृषी विभागातील रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१६-०७-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे. माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर विभागाच्या मंजूर पदांपैकी कृषि संचालकाचे १ व कृषि सहसंचालकाचे ५ पदे रिक्त होती.

(२) संचालक संवर्गात सेवानिवृततीने व सह संचालक संवर्गात सेवानिवृत्ती व वरीष्ठ संवर्गात पदोन्नती दिल्यामुळे निम्न संवर्गात पदे रिक्त दिसून येतात.

(३) कृषि विभागातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही कार्यान्वित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मालाड येथे भरधाव बसने धडक दिल्याने इसमाचा झालेला मृत्यु**

**(२७) ४३८९३ (१६-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मालाड येथे भरधाव बसने ५० वर्षीय इसमास जोराची धडक दिल्याने दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास सदर इसमाचा मृत्यु झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मृत इसमाच्या कुटूंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीसांनी केलेल्या तपासामध्ये बेस्ट चालकाच्या चुकीमुळे सदर अपघात घडल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी मालाड पोलस ठाणे येथे गु.र.नं. ७/२०१६, भा.दं. वि.स. कलम २७९, ३०४(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपी बेस्ट चालकाविरुध्द न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले आहे.
बेस्ट उपक्रमांच्या वतीने बस अपघातग्रस्त व्यक्तींना तातडीच्या औषधोपचाराकरीता आर्थिक मदत देण्यात येते. तसेच, अपघातात मृत झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकास तत्कालिक रु.१ लाख एवढी मदत करण्यात येते. रु.१ लक्ष आर्थिक मदत देण्याची कार्यवाही बेस्ट उपक्रमाकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वरळी (मुंबई) येथील डॉ ॲनी बेझंट रोडवरील आटारीया मॉल येथे भुयारी मार्ग तयार करण्याबाबत

**(२८) ४४४८३ (०७-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी (मुंबई) येथील डॉ ॲनी बेझंट रोडवरील आटारीया मॉल येथे वाहनांच्या वाढत्या रहदारीमुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून तातडीने भुयारी मार्ग तयार करण्याबाबत मा.लोकप्रितिनिधी यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी भुयारी मार्ग तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) प्राधान्यक्रम व निकष यांचे अनुषंगाने सदरचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

---

**कल्याण-कर्जत राज्यमार्गावर गावांच्या नावाचे फलक लावणेबाबत**

**(२९) ४४६१७ (०५-०५-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्याचे चौपदरीकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नुकतेच पुर्ण केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या चौपदरीकरण टेंडर निविदेतील अनेक बाबी अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जत तालुक्यात एकही गावाच्या नावाचा फलक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या ठेकेदाराने लावलेला नसल्यामुळे नवीन वाहन चालकांना गाडी चालविताना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने नावाचा फलक लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) व (२) प्रत्यक्ष रस्त्याचे काम करतेवेळी एकूण लांबीपैकी काही लांबीमध्ये वन विभागाच्या जमनीचे भुसंपादन, खाजगी जमीनीचे भुसंपादन व न्यायालयीन स्थागिती, इत्यादी करणांमुळे निविदेतील तरतुदीप्रमाणे रस्त्याचे रुंदीकरणाचे काम हाती घेणे शक्य झाले नाही. उर्वरीत लांबीमध्ये रस्त्याचे रूंदीकरणाचे काम उपलबध रुंदीमध्ये निविदेप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही. गावांच्या नावाचे फलक लावण्यात आलेले आहेत.

---

**विटा शहरात(जि.सांगली) येथील दारिद्र्यरेषेखालील लोकांना एकात्मिक गृहनिर्माण विकास योजनेंअंतर्गत घरकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) ४५३३४ (०५-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा शहरात (जि.सांगली) येथील दारिद्र्यरेषेखालील लोकांना एकात्मिक गृहनिर्माण विकास योजनेंअंतर्गत घरकुलाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची योजना पुर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-०७-२०१६) :**(१), (२) व (३) कैंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत सांगली जिल्ह्यातील विटा, नगरपरिषदे अंतर्गत ३९६ घरकुल प्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीने (CSMC) दि.६.३.२०१२ रोजी मंजूरी

दिली आहे. विटा, नगर परिषदेने सादर केलेल्या अहवलानुसार आजपावेतो २०४ घरकुलाचे काम पूर्ण करण्यात आले असून सदर घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. उर्वरीत १९२ घरकुलांचे काम प्रगती पथावर असून घरकुलाची इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्र, पाण्याची टाकी, शौचालय, गटारे इ. कामे पुर्ण झालेली आहे. ही सर्व अपूर्ण कामे डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याची खबरदारी नगरपरिषदेन घेतली आहे.

---

**नाशिक शहराला पिण्याचा पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या जीर्ण झाल्याबाबत**

**(३१) ४६६३७ (०५-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराला पिण्याचा पाणीपुरवठा करणाऱ्या इगतपुरी नगरपरिषदेच्या तलावातून फिल्टर यंत्रणेत वाहून नेणाऱ्या जलवाहिन्या जीर्ण झाल्याने तसेच फिल्टर हाऊसमधील सदोष व्हॉल्व्हमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याची गळती रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) नाशिक शहराला गंगापूर धरण समूह व चेहेडी बंधारा (दारणा नदी) या जलाशयातून पाणीपुरवठा होतो. इगतपुरी नगरपरिषदेच्या तलावातून नाशिक शहराला पाणीपुरवठा होत नाही.

तथापि, इगतपुरी नगरपरिषद तलावातून फिल्टर यंत्रणेपर्यंत जाणारी जलवाहीनी योग्यरीत्या कार्यरत आहे. तसेच फिल्टर हाऊसमधील वॉल्वमधुन मोठ्या प्रमाणात गळती आढळून आल्याची बाब निदर्शनास नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड शहरामध्ये अमृत योजनेअंतर्गत ड्रेनेज योजना मंजूर होणेबाबत**

**(३२) ४६८६९ (१३-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड शहरामध्ये अमृत योजनेअंतर्गत ड्रेनेज योजना मंजूर होणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावाकरिता निधीची तरतुद केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :**(१) अमृत अभियानांतर्गत सांगली शहराचा मलनिस्सारण विषयक सेवास्तर सुधारणा आराखडा शासनास प्राप्त झाला आहे.
(२), (३) व (४) अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या वर्षाचा राज्य वार्षिक कृति आराखडा तयार करण्यात येत आहे.

---

**राज्य शासनाकडून एलबीटीमध्ये सुट देण्याच्या केलेल्या घोषणेमुळे महानगरपालिकांना द्यावे लागणारे अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(३३) ४६९२९ (१७-०५-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून एलबीटीमध्ये सुट देण्याच्या केलेल्या घोषणेमुळे गेल्या पाच महिन्यांत तीन हजार कोटी रुपये राज्यातील महापालिकांना अनुदानापोटी द्यावे लागले, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाण्यासह राज्यातील अन्य महानगरपालिकांचे स्थानिक संस्था कराच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न बंद झाल्यानंतर काटेकोर नियोजन करुन अपेक्षेपेक्षा जास्त वसुली करणाऱ्या महानगरपालिकांना वगळून इतर कामचुकार महानगरपालिका, नगरपालिकांना शासनाने वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेना एलबीटीमुळे मिळेल्या अनुदानाने नवीन आर्थिक वर्षात सहा हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने दुष्काळीपोटी खर्च होणारा निधी तसेच इतर योजनांच्या खर्चात कात्री लावावी लागत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकांना देण्यात येत असलेले अनुदान अपुरे असल्यामुळे त्याची आर्थिक स्थिती खालावत चाललेली असून, कर्मचाऱ्यांचे वेतन देणेही अवघड होत आहे या बाबी विचारात घेता शासनाने अनुदानात वाढ करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्याचे विचाराधीन आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१६ ते मे, २०१६ या कालावधीत राज्यातील २५ महानगरपालिकांना एकूण रु.२०८०.५४ कोटी इतके सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस मर्यादित अर्थसंकल्पीत निधी विभागांना उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यानुषंगाने वितरीत निधी व त्याचा झालेला विनियोग तसेच वर्षभर अनेक तातडीच्या किंवा अनपेक्षित मान्य करण्यात आलेल्या मागण्या तसेच शासनाने परिस्थितीनुसार वेळोवेळी घेतलल्या निर्णयाच्या अनुषंगाने नियोजित खर्चाच्या बाबींच्या प्राथम्यक्रमामध्ये झालेला बदल या सर्व बाबींच्या तसेच राज्याच्या उपलब्ध साधनसंपत्तीचा साकल्याने विचार करुन निधी वितरणाच्या मर्यादेमध्ये वेळोवेळी वाढ करण्यात येते.

(४) महानगरपालिकांच्या उत्पन्नावर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाही तसेच त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राहील याची शासनाने पुरेपुर दक्षता घेतली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात कौशल्य विकास विदयापीठ स्थापन करण्याबाबत

**(३४) ४७३८६ (१७-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कौशल्य विकास विदयापीठ स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे काय.

(३) असल्यास, सदरचे विदयापीठ हे नाशिक येथे स्थापन करण्यात यावे अशी प्रकारची मागणी दिनांक ३१.०३.२०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर राज्यात सिबॉयसिस कौशल्य विकास विद्यापीठ स्थापनेबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) राज्यात स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दोन कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १३/१०/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. नाशिक येथे स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर कौशल्य विकास विद्यापीठ स्थापनेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नसल्याने पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द येथे म्हाडाने पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेली घरे अपात्र व्यक्तींना वितरित झाल्याबाबत**

**(३५) ४८२९७ (१७-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द-बेलापूर रेल्वे प्रकल्पबाधितांसाठी मानखुर्द येथे म्हाडाने पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत १९९० साली ९५३ सदनिका बांधल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९५३ सदनिकांपैकी १७१ घरे पात्र नागरिकांना डावलून अपात्र व्यक्तींना वितरित झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, १७१ घरे परत मिळविण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) उपाध्यक्ष, म्हाडा यांच्या अहवालानुसार पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत म्हाडामार्फत सन १९९० साली ९९० निवासी व ६१ अनिवासी अशा एकूण १०५१ गाळ्यांची वितरण सन १९९० दरम्यान पूर्ण करण्यात आले असून गाळेधारकांकडून प्रतीमहा रु. ११/- इतके शुल्क व्यवस्थापन आकार म्हणून गाळे निहाय वसुल करण्यात येते. सदरहू सदनिकांपैकी १७१ घरे पात्र नागरिकांना डावलून अपात्र व्यक्तींना वितरित केल्याप्रमरणे चौकशी सुरु असून, चौकशी अंती निष्कर्षाच्या आधारे कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राहता (जि. अहमदनगर) पालिकेकडून राहाता शहरासाठी दररोज मुबलक शुध्द पाणी मिळण्याबाबत**

**(३६) ४८३९६ (१७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहता (जि. अहमदनगर) पालिकेकडून राहाता शहरासाठी दररोज मुबलक शुध्द पाणी मिळावे या हेतूने राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजने अंतर्गत जीवन प्राधिकरण योजनेद्वारे १४ कोटी, वाढीव पाणी पुरवठा योजना १४ कोटी व एक योजना सुमारे तीन कोटी अशा एकूण सुमारे ३१ कोटी खर्चाच्या योजना सुरु करण्यात येऊनही नागरिकांना पाणी पुरवठा होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेचा अंदाजित खर्च रु.१०.७० कोटी आहे. केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजनेद्वारे पाणीपुरवठा योजना बळकटीकरणाचा अंदाजित खर्च रु.१४.०४ कोटी इतका असून सदर योजना नजीकच्या कालावधीत पुर्णत्वास जाईल. पूरक पाणी पुरवठा योजना अपूर्णावस्थेत असल्याने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत तात्पुरत्या स्वरुपातील उपायोजना म्हणून तात्पुरत्या साठवण तलावाच्या माध्यमातुन पाणी पुरवठ्याची सोय केलेली आहे.

---

## पुणे शहरातील पीएमपी बसची अपुरी संख्या, वाढते ब्रेकडाउन, मोडक्या बस आदी कारणांमुळे प्रवाशी पीएमपीपासून दुरावत असल्याबाबत

**(३७) ४८९३० (१७-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. कंपनी स्थापन झाल्यापासून ७ वर्षात तब्बल ६५ लाख नागरिकांना सुविधा देण्यासाठी अवघ्या ८४९ नवीन बस पीएमपीच्या ताफ्यात आल्या असून या आठ वर्षात जवळपास ५०९ बस भंगारात काढण्यात आल्या असल्याचे माहे जाने २०१६ दम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे शहरातील पीएमपी बसची अपुरी संख्या, वाढते ब्रेकडाउन त्यामुळे बंदिस्त झालेले उत्पन्न, मोडक्या-तोडक्या बस आदी कारणांमुळे प्रवाशीही पीएमपीपासून दुरावत चालले असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी नजीकच्या काळात कोणताही ठोस पर्याय उपलब्ध नसल्यामुळे शहरातील या एकमेव सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे काय होणार अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे खरे आहे काय,

(४) तसेच गत काही महिन्यांपासून पीएमपीच्या कार्यक्षमतेत वारंवार घट होणे, महापालिकांकडून मिळणारे अनुदान ठेकेदारांची देयके कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच त्यांच्या सुविधांवर खर्च होत असल्याने प्रवाशांना चांगल्या सुविधा देता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, तिन्ही कँटोन्मेंट बोर्ड, दोन्ही शहरांच्या हद्दीलगतची गावे यातील लोकसंख्या विचारात घेतल्यास किमान ३००० बस रस्त्यावर असणे गरजेचे असतांना प्रत्यक्षात फक्त १५०० बसेस रस्त्यावर असल्याने त्यातही बऱ्याचश्या बसेस नादुरुस्त असल्याने १५०० बसची तूट ही पीएमपीसाठी आवाक्याबाहेरची समस्या झाली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.

माहे जानेवारी, २००७ मध्ये परिवहन महामंडळामध्ये ११३१ इतका मालकीचा बस ताफा होता व भाडेतत्वावरील १९९ इतक्या बसेस अशा एकूण १३३० इतक्या बसेस संचालनासाठी उपलब्ध होत्या.

सन २००७ ते माहे मार्च, २०१६ अखेर ९८० बसेस नव्याने खरेदी करण्यात येऊन बस ताफ्यातून बाद करावयाच्या निकषानुसार माहे मार्च, २०१६ अखेर ७०९ बसेस मोडीत (स्क्रॅप) काढण्यात आलेल्या आहेत.

आज रोजी महामंडळाच्या मालकीच्या १४०२ बसेस व भाडेतत्वावरील ६५३ अशा एकूण २०५५ बसेसचा ताफा संचलनासाठी उपलब्ध आहे.

(२) महामंडळाच्या मालकीच्या १४०२ बसेसपैकी बसेस आर्युमाननुसार १ ते ५ वर्षाचा ४९८ बसेस, ६ ते १० वर्षाच्या ५८० बसेस, ११ ते १२ वर्षाच्या २३३ बसेस, १२ वर्षाच्या पुढील ९१ बसेस उपलब्ध असून संचलनामध्ये आहेत.

माहे जानेवारी, २०१६ मध्ये बसेसचे ब्रेकडाऊनचे प्रमाण ११०५ असे आहे.

सन २००८ मधील प्रतिदिवस प्रवाशी संख्या ८,०७,५११ होती. तर सन २०१५-१६ प्रतिदिवस प्रवाशी संख्या सरासरी ११,२४,३२८ इतकी असून, प्रवाशी संख्येत वाढ झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

१) परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये भाडेतत्वावरील ५०० बसेस घेणे तसेच महानगरपालिकेच्या माध्यमातून ५०० बसेस व शहर अंतर्गत वाहतुकीसाठी मध्यम आकारच्या २०० असेस अशा एकूण ७०० बसेस खरेदी करण्याचा ठराव क्र.९१, दिनांक ११.४.२०१६ अन्वये पारित झाला असून त्याद्वारे बस खरेदी व भाडेतत्वावर बस घेणेस तत्वत: मंजूरी दिली आहे.

२) बिझनेस प्लान - महामंडळाच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्यासाठी बिझनेस प्लॅन तयार करण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे. याबाबत E & Y (Ernst & Young) आणि UMTC (अर्बन मास ट्रांझिट कॉर्पोरेशन) या कंपनीची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर बिझनेस प्लॅनमध्ये महामंडळाचा खर्च कमी करणे, उत्पन्न वाढ, उच्च दर्जाची सेवा तसेच ब्रेकडाऊन व अपघात कमी करुन ऑपरेशनमधील त्रुटी कमी करण्याबाबत सूचना अपेक्षित असून त्यानुसार सुधारणा होवून तोटा कमी होणे अपेक्षित आहे.

३) तसेच बसेसच्या सक्षम देखभाल दुरुस्तीसाठी ६% राखीव रक्कम ठेवण्यात आलेली आहे. परिणामी बेकडाऊन कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

(४) हे अंशतः खरे आहे.

महामंडळाकडून चालविण्यात येणारे अनेक मार्ग तोट्यात आहेत. परंतु सामाजिक बांधीलकीमुळे सदर मार्ग बंद करताना अडचणी येतात. परिणामी तोटा होतो. महापालिकांकडून मिळणारे अनुदान हे संचालनातील महापालिकांकडून वार्षिक तुटींच्या आधारावर मिळते. महामंडळाच्या आर्थिक बाबींचे लेखापरीक्षणनुसार तूट निश्चिती होवून सदर तूट दरमहा दोन्ही महानगरपालिकांकडून स्वामित्वाच्या प्रमाणात महामंडळास प्राप्त होते. संचलन तुटीपोटी

मिळणारा निधी संचलनकामी वापरला जातो. महामंडळाकडून प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न होत असतो. उदा. बीआरटी, विमानतळ सेवा, पुणे दर्शन, जी पी एस सुविधा, अत्याधुनिक कंट्रोल सेंटर, हेल्प लाइन इ. सुविधाचे कामकाज प्रगतीपथावर आहे.

(५) व (६) परिवहन महामंडळाकडे एकूण २०५५ इतका बस ताफा असून, संचालक मंडळाने उपरोक्तप्रमाणे १२०० बसेसची वाढ करण्यासाठी प्रस्तावित केलेले असून नजीकच्या काळात या बसेस उपलब्ध होणार आहेत.

महिलांसाठी तेजस्विनी योजनेअंतर्गत काही बसेस खरीदीसाठीच्या उपाययोजना सुरु आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे-शहरात गत वर्षभरात झालेल्या अपघातांत एकूण ४३८ जणांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३८) ४९२०८ (२०-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-शहरात गत वर्षभरात झालेल्या वेगवेगळ्या अपघातांत एकूण ४३८ जणांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये तब्बल ६८ अल्पवयीन मुलांचा समावेश असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४३७ जणांचा मृत्यू हा हेल्मेट अभावी ओढवल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षित वाहतूकीबाबत तसेच अपघाती मृत्यू टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) वाहतूक शाखेकडून जनजगृतीचे कार्यक्रम राबवून विद्‌यार्थी, पालक यांना १८ वर्षाखालील मुलांना दुचाकी चालविण्यात देऊ नये याकरिता प्रबोधन केले जाते. सन २०१५ मध्ये १८ वर्षा खालील दुचाकी चालविणाऱ्या ३४५ मुलांवर कारवाई करुन त्यांच्याकडून रु.१,२१,९००/-एवढा दंड वसूल केला आहे. तसेच, वाहतूक पोलीसांकडून विशेष मोहिमा राबवून कारवाई केली जाते. हेल्मेट धारण न करणाऱ्या दुचाकी वाहन चालकांवर सन २०१५ मध्ये ३,०८,५७१ केसेस करुन रु.३,१३,४६,८००/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच, १३.६.२०१६ पर्यंत हेल्मेट धारण न करणाऱ्या दुचाकी वाहन चालकांवर ४७,८५२ केसेस करुन रु.४७,८५,२००/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच, मोटारवाहन कायद्यांतर्गत सन २०१५ व १३.६.२०१६ अखेर पर्यंत अनुक्रमे १,८८,०३१ व ९४,०५२ केसेस करुन कसुरदार वाहनचालकांकडून अनुक्रमे रु.२,०३,६८,०००/- आणि रु.९९,२७,०००/- एवढा दंड वसूल केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजूरा (जि.चंद्रपूर) येथे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुलांवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(३९) ४९३६० (०५-०५-२०१६). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्ह्यातील नगर परिषद, राजूरा येथे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत एकूण ७७७ घरकुलांच्या बांधकामाला सन २०१० मंजुरी मिळाली व सर्वे क्र. १४९ मध्ये १७५ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले परंतु लाभार्थ्याऐवजी इतरांनी त्या घरकुलात अतिक्रमण केल्याने लाभार्थ्यांना घरकुलाच्या ताब्यापासून वंचीत राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकुलाचा ताबा तात्काळ द्या अन्यथा उपोषण आंदोलनाचा इशारा घरकुल लाभार्थ्यांनी नगर परिषदेला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशी अंती काय निष्पन्न झाले व दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०७-२०१६) :**(१) व (२) केंद्र पुरस्कृत गृहनिर्माण झोपडपट्टी विकास, कार्यक्रम अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा, नगरपरिषदेस ७७७ घरकुल प्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीच्या (CMSC) दि. ०३.०२.२००९ रोजी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्प ६०० घरकुलांकरिता सिमित करण्यात आलेला आहे. राजूरा नगर परिषदेने सादर केलेल्या अहवालानुसार सर्व्हे क्र.१४९ मध्ये १७५ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले आहे. मात्र पात्र लाभार्थी ऐवजी १९ व्यक्तींनी त्या घरकुलांत अतिक्रमण केल्याने राजूरा नगर परिषदेच्या दि.२०.०२.२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरुन पोलीस व तहसिलदार कार्यालयाच्या मदतीने दि.२३.०२.२०१६ रोजी या १९ अतिक्रमित व्यक्तींना काढून ज्या पात्र लाभार्थीच्या नावे घरकुल मंजूर करण्यात आले आहे. त्या लाभार्थ्यास घरकुलाचा ताबा देण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर (जि.बीड) येथे दिवाणी न्यायालयाची इमारत उभारण्याबाबत**

**(४०) ५०२२२ (२०-०५-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.बीड) येथे दिवाणी न्यायालयाची इमारत उभारण्याच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने किती रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे तसेच इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) होय.

(२) शिरुर, जि.बीड येथे न्यायालयीन इमारत बांधण्याकरिता विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि.०९ जानेवारी, २०१३ अन्वये रु.३,२४,४१,४५४/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी सन २०१३-१४ मध्ये रु.१५० लक्ष, २०१४-१५ मध्ये रु.१५० लक्ष व २०१५-१६ मध्ये रु.१००.०० लक्ष इतकी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) ता.शिरुर येथील न्यायालयासाठी ताब्यात असलेली मौजे झापेवाडी सर्व्हे नं.५१ मधीर ४ हेक्टर जमीनीबाबत उप वन विभागीय अधिकारी, बीड यांनी सदरची जमीन राखीव वनक्षेत्र असल्याने बांधकाम करता येणार नाही. असा आक्षेप घेतल्यामुळे बांधकामास विलंब झालेला आहे. परंतु, सध्या तालुका शिरुर कासार येथील मौजे वारणी येथील गायरान जमीन गट नं.२५९ मधुन ४ हेक्टर आर. जमीन नवीन न्यायालय इमारत व न्यायाधीश निवासस्थान यांच्याकरिता उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वसई तालुक्यात करावयाच्या विकास कामांबाबत

**(४१) ५१२८७ (१७-०५-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर ते विरार मोनोरेल, विरार उपविभाग मल्टी कॅरीडोर, दहिसर, मीरा रोड माणिकपुर विरार मेट्रो रेल्वे वांद्रे दहिसर विरार पश्चिम सागरी जोडरस्ता ही कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात यावीत अशी स्थानिक लोकप्रतिनिधीं मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे वारंवार मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) विरार-अलिबाग या बहुउद्देशिय वाहतूक मार्गिकेसाठी केंद्रशासनाचे पर्यावरण विभागाचे व वन जमिनीचे ना हरकत मिळविण्यासाठी तसेच या मार्गिकेच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पासाठी जागा निश्चिती, प्रकल्पाची हद्द, सविस्तर नकाशे व अंदाजपत्रके भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करण्यासाठी सल्लागाराच्या नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वकष परिवहन अभ्यासामध्ये शिफारस करण्यात आलेल्या दहिसर-माणिकपूर विरार मेट्रो मार्गाची अंमलबजावणी ही टप्प्याटप्याने नियोजनबध्द पध्दतीने व निधी उपलब्धतेनुसार करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा तुरुगांतून 22 कैदी पॅरोल आणि फर्लो रजेवर जाऊन फरार झाल्याबाबत**

**(४२) ५१४७१ (२४-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पॅरोल आणि फर्लो रजा घेतलेले २२ कैदी येरवडा तुरुगांतून सन २००० पासून फरारी असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फरारी आरोपींना ताब्यात घेण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :**(१) होय, येरवडा मध्यवर्ती तुरुंगातून संचित व अभिवचन रजेवरुन सन २००० पासून माहे मार्च, २०१६ पर्यंत ८३ बंदी फरार आहेत.

(२) संचित व अभिवचन रजेवरुन फरार असलेल्या बंद्यावर भा.द.वि. २२४ प्रमाणे कारागृहामार्फत संबंधीत पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महिलासाठी असलेली हेल्पलाईन बंद असल्याबाबत**

**(४३) ५१८०७ (२०-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संकटात सापडलेल्या महिलांना त्वरित पोलीस साहाय्य मिळावे यासाठी राज्य शासनाने दिनांक २८ फेब्रुवारी २००८ रोजी सुरु केलेली १०३ व १०९१ या क्रमांकाची महिला सुरक्षा हेल्पलाईन अनेक ठिकाणी बंद असल्याचे दिनांक २५ नोव्हेबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हेल्पलाईन सुरु करुन त्या माध्यमातून महिलांना तत्परतेने मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर, मुंबई रेल्वे, पुणे रेल्वे व नागपूर रेल्वे, नाशिक शहर औरंगबाद ग्रामीण या ठिकाणी हेल्पाईन क्र.१०९१ कार्यरत नसल्याने त्याऐवजी फोनची व्यवस्था करण्यात आली असून, सदर फोन नंबराची प्रसिध्दी करण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त सर्व पोलीस घटकांमध्ये हेल्पलाईन चालू आहे.

(२) संकटात सापडलेल्या महिलांच्या मदतीकरिता टोल फ्री हेल्पलाईन क्र.१०३ मुंबई, ठाणे व नवी मुंबई करिता सुरु करण्यात आले असून, उर्वरित महाराष्ट्र राज्याकरिता टोल फ्री हेल्पलाईन क्र.१०९१ सुरु करण्यात आले आहे. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत १०३ व

१२९८ ही हेल्पलाईन सेवा २४ तास कार्यरत आहे. अन्यायग्रस्त महिलांना पोलीस आयुक्त मुंबई यांच्या नियंत्रणखाली www.mumbaipoiice.org हे वेबसाईटवर ऑनलाईन तक्रार करता येते किंवा ७७३८१४४१४४ / ७७३८१३३१३३ यावर sms पाठवून तक्रार नोंदवित येते. सह पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचे comcell.mum.crime@mahapolice.gov.in ईमेल ॲड्रेसवर अत्याचारग्रस्त महिला व मुलीना तक्रार करता येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदुर बाजार नगरपरिषद मालकीची जागा मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह बांधकामाकरीता सामाजिक न्याय विभागास हस्तांतरीत करण्याबाबत**

**(४४) ५२०७९ (१३-०५-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदुर बाजार नगरपरिषद मालकीची जागा मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह चांदुर बाजार येथे बांधकामाकरीता सामाजिक न्याय विभागास हस्तांतरीत करण्याबाबत तहसिलदार चांदुर बाजार यांनी दिनांक १ जानेवारी, २०१६ मध्ये ४ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक ५ जानेवारी, २०१६ पुर्वी नगररचना विभाग, अमरावती यांनी अभिप्राय अहवाल तातडीने द्यावेत असे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसिलदार चांदुर बाजार यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१५ मध्ये अशाच आशयाचे पत्र नगर रचना, अमरावती यांना दिले होते तरीही अहवाल सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तहसिलदारांच्या कामाच्या गांभीर्याबाबत देण्यात आलेले आदेश जाणीवपुर्वक ३ महिने प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) दि.०१.०१.२०१६ चे तहसिलदार चांदुर बाजार यांचे पत्र सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती यांना प्राप्त झालेले नाही.
(२), (३) व (४) दि.२१.१२.२०१५ चे तहसिलदार, चांदुर बाजार यांचे पत्र सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती यांना दि.२१.०१.२०१६ ला प्राप्त झाले असून सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती यांनी त्यांचे दि.१८.०२.२०१६ च्या पत्रान्वये तहसिलदार चांदुर बाजार यांना नगररचना विषयक अभिप्राय उपलब्ध करुन दिलेले आहेत. याप्रकरणी सकृत दर्शनी विलंब झाला आहे असे निष्पन्न न झाल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील असलेले तब्बल 314 वृक्ष तोडण्याची दिलेली परवानगी**

**(४५) ५२४७६ (१७-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महापालिका क्षेत्रातील नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावर द्वारका सर्कल ते दत्तमंदिर चौक आणि सिन्नर फाटा ते दारण नदीपयत दुतर्फा असलेले तब्बल ३१४ वृक्ष तोडण्याची परवानगी महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीने दिली असल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वृक्षतोडीच्या बदल्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला एकास दहा वृक्ष लागवड करण्याचे बंधन घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न 2 नुसार शासनाने या महामार्गावर वृक्षलागवडीचे कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, नियोजन केले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील असलेले 314 वृक्ष तोडण्याच्या परवानगीची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी मागणी केली आहे. परंतू मा.उच्च न्यायालयाने दि.23.3.2016 रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार सदरची झाडे तोडण्यात परवानगी देण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची बीज भांडवल योजनेची ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सुरु असलेली वेबसाईट बंद पडल्याबाबत**

**(४६) ५२६०९ (०१-०६-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची बीज भांडवल योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतीम मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३१ डिसेंबर, २०१५ पुर्वी सुमारे पाच दिवस आधीपासून वेबसाईड तांत्रिक बिघाड झाल्यामुळे बंद पडल्याने अनेक लाभार्थी अर्ज भरण्यापासून वंचीत राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्तप्रकरणात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली,

(४) तसेच ऑनलाईन अर्ज भरण्यापासून वंचीत राहिलेल्या लाभार्थ्यांना पुर्नसंधी उपलब्ध करुन देणे बाबत शासनाने कोणती उपययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. या योजनेमध्ये ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया निरंतर चालू राहणारी असून लाभार्थी केव्हाही अर्ज भरुन योजनेचा लाभ घेवू शकतात.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड येथील सहकारी कामगार कार्यालयातील रिक्त पदाबाबत**

**(४७) ५२६६९ (०३-०५-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील सहकारी कामगार कार्यालयात मागील दोन वर्षापासून १५ पैकी तब्बल १२ पदे रिक्त असल्याने कामगारांची नोंदणी करण्याचे काम बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही. बीड येथील सरकार कामगार अधिकारी कार्यालयातील १२ पदे रिक्त आहेत. तथापि बाह्ययंत्रणेमार्फत उपलब्ध झालेल्या ०५ व सध्या कार्यरत अशा एकूण ०८ कर्मचाऱ्यांकडून कामगारांच्या नोंदणीचे काम करण्यात येत आहे.

(२) व (३) कामगार आयुक्त यांचे आस्थापनेवरील गट क बाबत उच्चाधिकार सचिव मंजूरी दिल्यानुसार पदे भरण्याच्या सूचना कामगार आयुक्त यांना देण्यात आल्या आहेत.

---

**पुणे - नगर रस्त्यावर जागो-जागी खेदाईमुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(४८) ५२७८६ (१७-०५-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नगर रस्त्यावरगत सहा महिन्यापासून खराडी, चंदननगर, वडगावशेरी, विमाननगर या भागामध्ये महापालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करुन तयार केलेले रस्ते हे वारंवार होणाऱ्या खोदाईने अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) असल्यास, हा होणाऱ्या खर्च टाळता येवू शकतो काय, तसेच खोदाई करताना वाहनांची घ्यायची काळजी या विषयी येथे काहीही केल्याचे दिसून येत नाही, हेही खरे आहे काय,
(३) तसेच, खोदाई करताना या ठिकाणी नियमांची पायमल्ली होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६)** :(१) नाही.
(२) व (३) पुणे शहरात रस्त्याच्या अस्तित्वातील कॉक्रीट डक्ट व वाहीनी मधुन तसेच बाजुने/कडेने विविध कंपन्यांच्या ओ.एफ.सी. सेवा वाहिन्या, महाराष्ट्र नॅचरलगॅस पाईप लाईन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, भारत संचार निगम लिमिटेड यांच्या सेवा वाहिन्या व्यतिरिक्त पुणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, मल:निसारण, पावसाळी लाईन टाकण्यात येत असतात.

माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे धोरण व पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमानुसार प्राधिकृत अधिकाऱ्यांची मान्यता सादर केल्यानंतर भूमिगत सेवा वाहिन्या टाकण्याकरिता मुख्य सभा ठराव क्र. ०५ दिनांक २०,५,२०१४ चे नियमानुसार खोदाई पुनर्स्थापना आकार शुल्क भरुन घेऊन सदर धोरणानुसार परवानग्या देणे महानगरपालिकेस क्रमप्राप्त होते.

तसेच सदर कामाकरिता काही ठिकाणी संबंधित कंपन्यांनी मायक्रोट्रेंचिंग व एच.डी.डी. पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तसेच खोदाईस प्रारंभ करुन वाहतुक पोलिस विभागाच्या सुचनेनुसार वाहतूक विषयक सुरक्षिततेविषयक उपाययोजना करुन चर खोदाई करुन भूमिगत सेवा वाहिन्या टाकलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरातील कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आल्याबाबत**

**(४९) ५३०९६ (२०-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात दिनांक १ जानेवारी, २०१६ तसेच कामटवाडा भागात दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी पाथर्डी फाटा परिसरात वाहनांची जाळपोळ करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच खून, खंडणी आणि टोळीयुद्धांमुळे नाशिक शहरातील कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. हे खरे नाही. माहे जानेवारी, २०१६ मध्ये खुन या सदराखाली ५ गुन्हे दाखल असून सर्व गुन्हे उघडकीस आले आहेत. खंडणी या सदराखाली ३ गुन्हे दाखल असून त्यातील आरोपींन अटक करण्यात आली आहे. नाशिक आयुक्तलय कार्यक्षेत्रात टोळीयुध्दांबाबत गुन्हा दाखल नाही.

(३) दि.०१.०१.२०१६ रोजी वाहनाची जाळपोळी बाबत अंबड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ०१/२०१६ भ.द.वि. कलम ४३५, ४३६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून एकुण ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींपैकी २ आरोपी सध्या जामिनार मुक्त आहेत.

दि.०८.०२.२०१६ रोजी पाथर्डीफाटा परिसरात एक दुचाकीवाहन जळाल्या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाणे येथे अकस्मात जळीत नं.०१/२०१६ दाखल करण्यात आले आहे. तपासात सदर वाहन बॅटरी स्पार्कींगमुळे झाल्याचा संशय साक्षीदारांनी व्यक्त केला असून कोणाविरुध्द संशय नसल्याचे सांगितले आहे.

पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे हद्दीतील ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी गुन्हेगारी चेकींग, कोम्बींग ऑपरेशन, ऑल आऊट ऑपरेशन आदि मोहिमा राबविण्याबाबत आदेशित कण्यात आले आहे. सराईत गुन्हेगारांवर हद्दपार कारवाई तसेच मोक्का कायद्यान्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे. अवैध धद्यांबाबत गुप्त माहितीदारांमार्फत माहिती मिळवून कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक मेट्रोकरिता नाशिक महापालिकेने शहर वाहतूक विषयक सर्वकष अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याबाबत**

**(५०) ५३१०९ (१७-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मेट्रोकरिता नाशिक महापालिकेने शहर वाहतूक विषयक सर्वकष अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निदेश शासनाने नाशिक महानगरपालिकेस दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार नाशिक शहरात मेट्रोबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत. ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) होय.

(२), (३) व (४) नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरातील नागरी वाहतूक विषयक सर्वकष अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नियुक्ती केली आहे.

सदर अहवाल मे, २०१७ पर्यंत सल्लागारामार्फत नाशिक महानगरपालिकेस सादर करण्याचे अपेक्षित आहे. नाशिक महानगरपालिकेमार्फत शासनास अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.